जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JAN 2025

तरुण भारत

# 'राजाराम' मध्ये उद्यापासून राजाराम महोत्सव

**कोल्हापूर :** शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करत असलेल्या राजाराम महाविद्यालयाच्यावतीने २७ ते २९ जानेवारी या कालावधीत राजाराम महोत्सवाचे आयोजन केले आहे. यामध्ये काव्यांगण, लेखकांशी मुक्तसंवाद, विविध गुणदर्शन, विनोदी कथाकथन, बासरीवादन व एकपात्री अभियन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहातच होतील, अशी माहिती राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्यस डॉ. अनिता बोडके यांनी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवारपासून महाविद्यालयाअंतर्गत विविध खेळांच्या स्पर्धांना सुरुवात केल्याचे सांगून डॉ. बोडके म्हणाल्या, सोमवार २७ रोजी सकाळी दहा वाजता राजाराम महोत्सवाच्या उद्घाटनाला प्रमुख अतिथी म्हणून उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के हे उपस्थित राहणार आहे. पद्मभूषण शां. बा. मुजुमदार यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. डॉ. बी. एम. हिर्डेकर हे मार्गदर्शनपर भाषण होणार आहे. पत्रकार परिषदेला सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ. विश्वनाथ देशमुख, डॉ. रघुनाथ कडाकणे, डॉ. धनंजय देवळालकर, डॉ. संजय पाठारे, डॉ. संजय मोरये व डॉ. ऋषिकेश दळवी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JAN 2025
पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते : डॉ. चौगले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या मौजे वसगडे (ता. करवीर) येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. सुयश झुणके यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. संपदा टिपकुर्ले, ज्युनिअर एन.एस.एस. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. सी. सी. पाटील, प्रा. नयना पाटील उपस्थित होते.